# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे उस्माननगर जि. नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | पो.स्टे उस्माननगर गु.र.नं. १२/२०२६ क. ७,१२ भ्र.प्र.अ. १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ५६ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | १) श्रीमती विद्या बळवंत वांगे, वय ५५ वर्षे, मुख्याध्यापिका (गट क), रा. शाहू महाराज पुतळ्याजवळ, समता नगर रोड, पावडेवाडी नाका, नांदेड<br>२) रामेश्वर शामराव पांडागळे, वय ५६ वर्षे, सहशिक्षक (गट क), रा.शंकर नगरी, गेट नंबर २, भगतसिंग चौक, आसर्जन, विष्णुपुरी रोड, नांदेड<br>३) गौतम जयवंतराव सोनकांबळे, वय ५६ वर्षे, सहशिक्षक (गट क), रा. हडको, नवीन नादेड सर्व नेमणूक जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर, ता.कंधार, जि. नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक २९.०१.२०२६ चे १५.५२ ते १५.५८ वाजताचे दरम्याण |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ३०.०१.२०२६ चे ०१.४४ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | १२००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | १२००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** — दि. २७/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार व त्यांची पत्नी जिल्हा परिषद शाळा उस्माननगर येथे शिक्षक व शिक्षिका म्हणून सन २०१९ ते माहे सप्टेंबर २०२५ पर्यंत कार्यरत होते. माहे सप्टेंबर २०२५ मध्ये दोघांची जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर येथून बदली झाली आहे. सध्याला त्यांना आयकर रिटर्न भरण्यासाठी सन २०२५ चे पगाराचे विवरणपत्र लागत असल्याने तक्रारदार यांनी दिनांक २६/०१/२०२६ रोजी जिल्हा परिषद शाळा उस्माननगर येथील मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांना मोबाईलवर कॉल करून त्यांचे व त्यांचे पत्नीचे सन २०२५ चे पगाराचे स्टेटमेंट देण्याची विनंती केली. तेव्हा मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांनी दोघांचे पगाराचे विवरणपत्र देण्यासाठी प्रत्येकी ६०० रुपये प्रमाणे १२००/— रुपये द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली होती.<br>दि. २९/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर येथे जाऊन मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांची भेट घेतली. तेव्हा त्या ठिकाणी सहशिक्षक गौतम सोनकांबळे हे पण हजर होते. तक्रारदार यांनी मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांना त्यांचे व त्यांचे पत्नीचे सन २०२५ चे पगाराचे विवरण पत्र देण्यासाठी विनंती केली. तेव्हा मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांनी सोनकांबळे सरकडे पगाराचे विवरण पत्र आहेत ते घेऊन या असे म्हणून तक्रारदार यांना सहशिक्षक सोनकांबळे यांच्याकडे पाठविले. तक्रारदार हे सहशिक्षक सोनकांबळे यांच्याकडे गेले तेव्हा सोनकांबळे यांनी प्रत्येकी ६००/— रुपये असे दोघांचे एकूण १२००/— रुपये मुख्याध्यापक मॅडमला देऊन टाका असे म्हणून तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर सहशिक्षक सोनकांबळे यांच्याकडून तक्रारदार यांनी त्यांचे व त्यांचे पत्नीचे पगाराचे विवरणपत्र घेऊन मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांच्याकडे गेले. तेव्हा मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांनी सहशिक्षक पांडागळे यांना मोबाईलवर फोन लावून कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर मुख्याध्यापिका यांनी १२००/— रुपये लाचेची मागणी करून फोन पे वर टाकण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी माझे फोन पे सध्या चालत नाही नगदी घेऊन येतो असे म्हणून परत आले.<br>दि. २९/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी जिल्हा परिषद शाळा उस्माननगर येथे मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांच्याकडे जात असताना शाळेचे गेटवर असताना सहशिक्षक सोनकांबळे यांनी तक्रारदार यांना फोन करून लवकर पैसे घेऊन या की आम्ही वाट बघत थांबलो आहे असे म्हणून तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले. त्यावेळी तक्रारदार यांनी आलो गेट जवळ आहे असे म्हणून मुख्याध्यापिका विद्या वांगे यांच्याकडे जाऊन तुम्ही सांगितल्याप्रमाणे १२००/— रुपये आणले आहेत तुमच्या हाताने घेऊन पगाराचे विवरण पत्र देऊन टाका अशी विनंती केली तेव्हा मुख्याध्यापिका श्रीमती विद्या वांगे यांनी १२००/— रुपये सहशिक्षक पांडागळे यांच्याकडे द्या असे सांगितले त्यावेळी सहशिक्षक पांडागळे व सहशिक्षक सोनकांबळे हे पण त्या कार्यालयात उपस्थित होते. तेव्हा तक्रारदार हे सहशिक्षक पांडागळे यांच्याकडे जाऊन लाचेची रक्कम दिली तेव्हा सहशिक्षक पांडागळे यांनी १२००/— रुपये आहेत का असे म्हणून स्वत:साठी व मुख्याध्यापिका श्रीमती वांगे यांच्यासाठी १२००/— लाच रक्कम स्वीकारताना रंगेहाथ मिळून आले आहेत. म्हणुन पोस्टे उस्माननगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक रसुल तांबोळी व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| १) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक | – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९ |
| २) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक | – ०२४६२ – २५५८११ |
| ३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक | – मो.नं. ९३५९०५६८४०. |
| ४) टोल फ्रि | – १०६४ |
| ५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक | – ०२४६२ – २५३५१२ |
| ६) Website | – www.acbmaharashtra.gov.in |
| ७) Mobile App | – www.acbmaharashtra.net |
| ८) Facebook Page | – www.facebook.com/maharashtraACB |
| ९) Twitter | – @ACBnanded |
| १०) Instagram | – acb_nanded |
| ११) Youtube Cahnnel | – @AntiCorruptionBureauNanded |
| १२) whats App number | – ८९५६५०१०६४ |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.विभाग,नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड